# दस्त नोदंणीसंदर्भात गृहभेट देणे

Visit outside office regarding Registration

**प्रक्रीया** (Process)

## अ.पक्षकारांकडुन करावयाची प्रक्रीया -

1. दस्त नोदंणीस सादर करणेस किंवा दस्तावर केलेल्या निष्पादनाचा कबुलीजबाब देण्याकरीता शारीरीक असमर्थतेमुळे दुय्यम निबंधक कार्यालयात येउ शकत नसल्याने, दुय्यम निबंधक यांनी त्यांचे राहते घरी येउन वरील कार्यवाही करणेसाठी अर्ज करणे. अर्जामध्ये नमुद कारणाचे पृष्ठयर्थ सबळ पुरावे जोडणे.
2. अर्ज हा ज्या प्रतिनिधीमार्फत दाखल करीत आहेत, त्याचे नाव अर्जात नमूद करणे.
3. अर्ज हा संबधित दुय्यम निबंधक यांचे कार्यालयाचे नावे करुन, त्यावर रुपये 5/- चे चिकट मुद्रांक लावणे तसेच अर्जावर गृहभेटीचे ठिकाण नमूद करणे. अर्जासोबत किंवा गृहभेटीचे अगोदर गृहभेट फी रुपये 300/- जमा करणे.
4. गृहभेटीच्या ठरलेल्या ठिकाणी, गृहभेटी प्रक्रीयेचे स्वत:चे खर्चाने चित्रीकरण करुन, त्याद्वारे तयार होणारी सीडी दुय्यम निबंधक कार्यालयात जमा करणे.

## ब.दुय्यम निबंधक कार्यालयाकडुन करावयाची प्रक्रीया-

1. वरीलप्रमाणे अर्ज आल्यास, अर्जात नमुद केलेले गृहभेटीचे ठिकाण हे त्यांचे कार्यक्षेत्रात येत असल्याची खात्री करणे

2.अर्जामधील कारण हे संयुक्तीक असल्याची खातरजमा करणेसाठी सोबत जोडलेले सबळ पुरावे पाहणे

3. गृहभेटीची देणे आवश्यक असल्याची खातरजमा झाल्यास दिनांक व वेळ ठरवून अर्जदारास कळविणे.

4.गृहभेटीचे रुपये 300/- जमा करुन घेउन तशी पावती अर्जादार यांना देणे.

5. गृहभेट देउन, गृहभेटीचे चित्रीकरणाच्या प्रक्रीया व्यवस्थीत होत असल्याची खातरजमा करणे

6.गृहभेटीबाबतचा शेरा दस्तावर नमूद करणे. गृहभेटीबाबतचे सविस्तर इतीवृत्त मिनट बूकमध्ये नमूद करणे
7.चित्रीकरणाची सीडी कार्यालयात जमा करुन घेणे.

यासंबधात अधिक माहीतीकरीता, सारथी < दस्त नोंदणी< दस्त नोंदणी प्रक्रीया<दस्त नोंदणीसाठी गृहभेट पहावे.